जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४९४ दिनांक - २६/११/२०२४

कोथरूड पोलीस स्टेशन,पुणे शहर

# कोथरूड पोलीस ठाणेकडील गुन्हयात आरोपीस जन्मठेपेची शिक्षा

कोथरूड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर१८३/२०१८ भारतीय दंड संहिता १८६० कलम३०२, ३४ मधील आरोपी सुशांत ओंबाळे व मयत अक्षय जोरी हे मित्र असुन सुमारे दोन वर्षापासुन सुशांत ओंबाळे व त्याची प्रेयसी यांचे प्रेमप्रकरण अक्षय जोरी याने प्रेयसी हिचे घरी सांगितल्याचे कारणावरुन वाद झाल्याने आरोपी यांनी संगणमतकरुन दि. १०/०७/२०१८ रोजी पहाटे ०४/०० वा. चे सुमा. कलाग्राम सोसा. प्लॅट नं. ५ जैन लोहीया आयटी पार्क मागे कोथरुड पुणे येथे अक्षय जोरी यास सुशांत ओंबळे याने बिअरची बाटली फोडुन ती अक्षयचे गळयाजवळ खुपसून त्यास जिवे ठार मारले होते. दाखल गुन्हयाचा आरोपी नामे **१)** सुशांत रमेश ओंबळे वय २४ वर्षे रा. व्दारा साळुंखे, प्लॅटनं ०३, सिंपली साउथ हॉटेलच्या समोर, गुजरात कॉलनी, कोथरुड, पुणे मुळगाव- मु.पो. विठ्ठलवाडी पौड ता.मुळशी जि. पुणे **२)**प्रशांत रमेश ओंबाळे वय २५ वर्षे रा.सदर**३)** महेश ऊर्फ सागर मुकुंद मेस्त्री वय २९ वर्षे रा. स. नं. ८८/८/ब गुजरात कॉलनी, आत्रेय सोसायटी शेजारी, भेलके चाळ, कोथरुड, पुणे यांना दिनांक १०/०७/२०१८ रोजी १४/०० वा.अटक करून तपास तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक आप्पासाहेब शेवाळे यांनी पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

नमूद केसची सुनावणी मा.श्री.ए. एन.मरे जिल्हा व अति. सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय पुणे यांचे समक्ष चालू असताना पैरवी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक,भागवत मुळे व कोर्ट अंमलदार महिला पोलीस अंमलदार जगदाळे कोथरूड पोलीस ठाणे पुणे यांनी दाखल गुन्हयातील फिर्यादी, साक्षीदार व इतर आवश्यक पुरावे मा.न्यायालयात वेळेत सादर केले.नमूद गुन्हयातील आरोपी नामे **सुशांत रमेश ओंबळे वय २४ वर्षे रा. व्दारा साळुंखे, प्लॅट नं ०३, सिंपली साउथ हॉटेलच्या समोर, गुजरातकॉलनी,कोथरुड, पुणे मुळगाव- मु.पो. विठ्ठलवाडी पौड ता.मुळशी जि. पुणे यास दि. २५/११/२०२४ रोजीमा.न्यायालयाने सीआरपीसी २३५(२) अन्वये आजन्म (जन्मठेप) सश्रम कारावास व ३०,०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.**

तपासी अंमलदार तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.आप्पासाहेब शेवाळे व पैरवी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक भागवत मुळे व कोर्ट अंमलदार महिला पोलीस अंमलदार जगदाळे कोथरूड पोलीस ठाणे पुणे यांनी वर नमूद गुन्हयात उत्तम कामगिरी केली आहे.